महाराष्ट्र शासन

**आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय**

जुने जकात घर, २रा मजला,शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३
ईमेल - directorcysed@gmail.com fax & Tel no २२६६१९८७

विषय:- जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याबाबत.

**परिपत्रक**

क्र. डिईटी. ११२०१६/६६९३/२२४/नऊ

मुंबई, २० फेब्रुवारी, २०१७

महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अंतर्गत नोंदविण्यात आलेल्या गुन्हयात कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले, काकवी / काळा गुळ, साहित्य, दारु गाळण्याची भट्टी, भांडी, साधने किंवा उपकरणे तसेच अशा निषेधित वस्तू वाहून नेण्याकरिता वापरण्यात आलेली जनावरे, गाडया इत्यादी वस्तु जप्त करण्यात आलेल्या असल्यास त्या वस्तू कलम ९८ व ९९ अन्वये शासन जमा (confiscation) करण्याबाबतचे अधिकार मा.न्यायालयास आहेत. परंतु महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम १०० अन्वये एखादा अपराध केला असल्यास आणि अपराधी माहिती नसेल किंवा सापडणे शक्य नसेल किंवा या अधिनियमान्वये जप्त करण्यात आलेल्या वस्तू / पदार्थ शासन जमा करण्यास पात्र असेल तेव्हा त्या जप्त वस्तू /पदार्थ चौकशीअंती शासन जमा करण्याचे अधिकार आयुक्त, जिल्हाधिकारी किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेला अधिकारी यांना आहेत. तर कलम १०१ अन्वये ज्या जप्त वस्तू त्वरित व नैसर्गिकरित्या नाश पावण्यास योग्य असतील त्यांचा लिलाव करण्यास मंजूरी देण्याचे अधिकार आयुक्त, न्यायालय, जिल्हाधिकारी किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेला अधिकारी यांना आहेत.

महाराष्ट्र दारुबंदी शासन जमा किंवा समर्पित वस्तु (विल्हेवाट) रेग्युलेशन १९५३ मधील नियम २ अन्वये मा.न्यायालयाने अथवा इतर प्रकारे महाराष्ट्र दारुबंदी कायदा,१९४९ मधील तरतुदीला अनुसरून एखाद्यी वस्तु, वाहन, प्राणी इत्यादी शासन जमा अथवा शासन समर्पीत करणेबाबत आदेश निर्गमित केले असल्यास त्या वस्तु , वाहने इत्यादीची विल्हेवाट (Disposal) लावण्यासाठी जिल्हाधिकारी यांना वर्ग / हस्तांतर करतील व जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये नियमातील तरतुदीला अनुसरून सदर शासन जमा (confiscated) मुद्देमालाची विल्हेवाट लावावी असे नमूद केले आहे.

शासन अधिसुचना, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २८ मे, २००२ अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम १०० व १०१ अन्वये जप्त केलेल्या मुदेमालाची किंमत रु.२५,०००/- पर्यंत असल्यास अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना, तर मुद्देमालाची किंमत रु.२५,०००/- पेक्षा जास्त परंतु रु.१ लाखा पर्यंत असल्यास विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांना व मुद्देमालाची किंमत रु. १ लाखा पेक्षा जास्त असल्यास आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांना विल्हेवाट लावण्यास मंजूरी देण्याचे अधिकार आहेत.

Scanned by CamScanner

राज्यातील विविध जिल्हयातून जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्यासाठीची प्रकरणे या कार्यालयास सादर केली जातात. त्यावरील मंजूरी आदेश व त्या नंतर निपटारा करणे व पुढील प्रक्रिया राबविण्यामध्ये विलंब होत असतो. कलम ९८ व ९९ अंतर्गतची प्रकरणे सुध्दा या कार्यालयास सादर केली जातात. वास्तविक या प्रकरणांचा निपटारा जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने करणे आवश्यक आहे. त्यामध्ये मुद्देमालाची किंमत महत्वाची नसून मा.न्यायालयाचे आदेश महत्वाचे आहेत.

जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीबाबतच्या प्रक्रियेतील विलंब टाळावा म्हणून मुद्देमालाच्या विल्हेवाटीबावत पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

i. गुन्हा अन्वेषणात जप्त (seized) केलेल्या वस्तू, वाहने इत्यादींना मा.न्यायालयाने महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम ९८ व ९९ अन्वये सदर बाबी शासन जमा (confiscation) करणेबाबत अथवा नियमानुसार विल्हेवाट लावणेबाबत आदेश दिल्यानंतर त्याबाबतची संपूर्ण प्रक्रिया जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने करण्यात यावी.

ii. बेवारस गुन्ह्यात जप्त (seized) केलेल्या वस्तू, वाहने इत्यादींना मा.न्यायालयाने अथवा जिल्हाधिकारी / आयुक्त यांनी महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम १०० व १०१ अन्वये सदर बाबी शासन जमा (confiscation) करणेबाबत अथवा नियमानुसार विल्हेवाट लावणेबाबत आदेश दिल्यानंतर जर मुद्देमालाची किंमत रु.१ लाखा पेक्षा जास्त परंतु रु.१० लाखापेक्षा कमी असल्यास जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने विल्हेवाटीबाबतची कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल आयुक्त कार्यालयास पाठविण्यात यावा.

iii. बेवारस गुन्ह्यात जप्त (seized) केलेल्या वस्तू, वाहने इत्यादींना मा.न्यायालयाने अथवा जिल्हाधिकारी / आयुक्त यांनी महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम १०० व १०१ अन्वये सदर बाबी शासन जमा (confiscation) करणेबाबत अथवा नियमानुसार विल्हेवाट लावणेबाबत आदेश दिल्यानंतर जर मुद्देमालाची किंमत रु.१० लाखा पेक्षा जास्त असल्यास सदर प्रकरणे पूर्व मान्यतेसाठी या कार्यालयास सादर करावीत.

यापूर्वी या कार्यालयास सादर करण्यात आलेल्या प्रकरणांचा निपटारा सुध्दा या परिपत्रकातील तरतुदी प्रमाणे करण्यात यावा.

( व्ही. राधा )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१. सर्व विभागीय उपआयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क.

२. सर्व अधीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क.

Scanned by CamScanner